॥ श्री ॥

॥ बाबा ॥

# भूपाळी

बाबा उठा, जागे व्हा, पहाट समय झाली
पक्षी किलबिल करीती, कुकुट ओरडूनी सांगती ॥

पूर्व दिशा ती आनंदित झाली
आदित्यनारायणे प्रभा फाकली
दाही दिशा ह्या झाल्या सुगंधित
नाजुक फुले ती आली बहरून
भूमातेचे पवित्र दर्शन, घ्याया नेत्र उघडा ॥1॥

प्रभातकाली झुळूझुळू वारा
मानवी वटवृक्ष हर्षित झाला
पंचप्राण ते झाले केंद्रित
अंतरीचा आत्मा झाला व्याकूळ
दावण्या सुमुख गोकुळनंदा, उठोनि स्वस्थचि बैसा ॥2॥

परमात्मास्वरूप बाळकृष्णरूप
बालिश गोजिरे निरागस
तुझ्या दर्शने पुलकित चित्त
उल्हासित होती पाहूनी रूप
घ्याया दर्शन आपुले बाबा, बाळे तुमची आतुरती ॥3॥

★★★★★